**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत (MGNREGS) केंद्र शासनाने निश्चित केलेल्या मजुरी दरापेक्षा देय ठरणा-या जादा मजुरीचा खर्च राज्य निधीतून करणेबाबत....**

# महाराष्ट्र शासन

नियोजन विभाग (रोहयो प्रभाग)
शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१२/प्र.क्र.०३/रोहयो-१
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : १५ मार्च, २०१२

**वाचा :** १. केंद्र शासनाचे जे-११०११/१/०९-एमजीएनआरजीए(पार्ट) दि.३१.८.२०१० चे पत्र.
२. शासनाचे समक्रमांकित दिनांक १० जानेवारी, २०१२ चे पत्र.
३. शासन निर्णय मग्रारोहयो-२०१०/प्र.क्र.०९/रोहयो-७ दि. ३ फेब्रुवारी, २०१२

## प्रस्तावना :-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमातील कलम ६ (१) अन्वये केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्यासाठी रुपये १२७/- इतका मजुरीचा दर विहीत केला आहे. असे असले तरी राज्यामध्ये महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेवरील मजुरांना त्यांनी केलेल्या कामानुसार (On the basis of task ) मजुरी अदा केली जाते. राज्यामध्ये साधारणतः सरासरी रुपये १५०/- ते रुपये १७०/- च्या दरम्यान मजुरी अदा करावी लागत आहे. केंद्र शासनाने उपरोक्त संदर्भाधीन दिनांक ३१ ऑगस्ट, २०१० च्या पत्रान्वये केंद्रीय मजुरी दरापेक्षा (रुपये १२७/-) जादा मजुरी अदा केल्यास त्यावर होणारा खर्च राज्य शासनाच्या निधीतून भागविण्यात यावा असे कळविले आहे. त्यानुसार अतिरिक्त मजुरीचा खर्च राज्याच्या निधीतून भागविण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. तथापि, सन २०११-१२ मध्ये झालेला अतिरिक्त मजुरी खर्च राज्य शासनाच्या निधीतून भागविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

## शासन निर्णय :-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेवरील मजुरांना केंद्र शासनाने विहित केलेल्या मजुरी दरापेक्षा (रु. १२७/- ) सन २०११-१२ मध्ये जादा झालेला खर्च राज्य शासनाच्या निधीतून भागविण्यास या आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरचा खर्च प्रधानशिर्ष "मागणी क्र.ओ-३, २५०५-ग्रामीण रोजगार, ६०-इतर कार्यक्रम, ००१-रोजगार हमी योजना, पंचवार्षिक योजनेंअतर्गत योजना, (०१) (०१) रोजगार हमी योजना (२५०५००२२-दत्तमत),०२-मजुरी" अंतर्गत सन २०११-१२ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला आहे. त्याचा संगणक सांकेतांक २०१२०४०३१०४६५२४५२००१ असा आहे.

सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**(वि.पु.काळे)**
**अवर सचिव (रोहयो) नियोजन विभाग.**

प्रति,

मा. राज्यपाल यांचे खाजगी सचिव.
मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
सर्व मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.
सर्व अतिरिक्त मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त.
आयुक्त (कृषि),महाराष्ट्र राज्य, पुणे.
मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे.
प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर
संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य,पुणे
संचालक, भुजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
उप सचिव (रोहयो समिती), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी (बृहन्मुंबई वगळून)
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद.
महासंचालक, अर्थ व सांखिकी संचालनालय, मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई. (प्रसिध्दी करीता),
विभागीय कृषि सहसंचालक,ठाणे,पुणे,कोल्हापूर,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर, लातूर.
सर्व अधीक्षक कृषि अधिकारी,
सर्व सहसंचालक, सामाजिक वनीकरण वृत्ते, नागपूर/अमरावती/औरंगाबाद/नाशिक/पुणे/ कोंकण वृत्त ठाणे.
सर्व मुख्य वन संरक्षक/सर्व उप वनसंरक्षक.
सर्व विभागीय वन संरक्षक/सर्व विभागीय मृदसंधारण अधिकारी.
सर्व उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग,
सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१ व २, मुंबई व नागपूर,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २, मुंबई व नागपूर,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व कार्यासन अधिकारी, रोहयो प्रभाग व जलसंधरण विभाग/निवडनस्ती / सारग्रंथ रोह